(A High Impact Factor, Quarterly, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)

NAVJYOT / Vol. XIII / Issue – III ISSN 2277-8063

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि ख्रिस्ती समाज

**प्रा. अविनाश भोरे** प्रमुख, मराठी विभाग मिरज महाविद्यालय, मिरज भ्रमणध्वनी: ९८८१४४६३०७

---

**प्रस्तावना:**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर धर्मनिष्ठ होते. पण धर्मांध नव्हते. ते बुध्दीप्रामाण्यवादी असल्याने विषमता हा हिंदू धर्माचा पाया आहे. हे त्यांच्या लक्षात आल्याने त्यांनी हिंदू धर्मात मरणार नसल्याची घोषणा केली होती. (दि.१३ ऑक्टोंबर, १९३५) त्यानंतर त्यांनी धर्मांतर केले. (दि.१४ ऑक्टोंबर, १९५६) ह्या एकवीस वर्षात त्यांनी अनेक धर्मांचा अभ्यास केला. धर्माच्या आवश्यकतेवर त्यांचा विश्वास होता. मनुष्याच्या घडणीत धर्माला मोठे स्थान आहे. आपल्या ठायी ज्या काही चांगल्या गोष्टी आहेत. ती धर्माची फळे आहेत, असा त्यांचा विश्वास होता. आंबेडकरांचा देवावर विश्वास होता. त्यांना वाटे की मनुष्याच्या जीवनाचे नियंत्रण करणारी कुठेतरी अज्ञात अशी शक्ती असावी. त्या अज्ञात शक्तिवरील विश्वास ते कधी-कधी बोलून दाखवीत. एकदा ते एका लहान शहरातून जात असता त्यांच्या गाडीला अपघात होतो. त्यातून ते व गाडीचा चालक सुरक्षित राहतात. तेव्हा त्यांनी अस्पृश्य शक्तीस आपला जीव वाचविल्याबद्दल प्रार्थनापूर्वक धन्यवाद देतात. घरी परतल्यानंतर मुलगा नि पुतण्या यांना पोटाशी धरून म्हणतात, 'नियतीचे देणे आणि अदृश्य शक्तिची कृपा म्हणून माझा प्राण वाचला' असे म्हणून ते आक्रंदून रडू लागतात. आपला (असा उल्लेख 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर'- धनंजय कीर यांच्या या चरित्रग्रंथात पृ.-५३२ चौथी आवृत्ती, २००६ वर दिसून येतो.) ही अदृश्य शक्तिवरील श्रद्धा त्यांनी बुद्धाच्या मुर्तीपुढे प्रार्थना करून, त्याची पूजा करून बुद्धभक्तीत विलीन केली. असे त्यांच्या अध्यात्मिक भावा विषयी चरित्रकार धनंजय कीर यांनी म्हटले आहे. या उल्लेखाचा हेतू असा आहे की, धर्म व त्या धर्माचा समाज यांच्या संबंध घनिष्ठ असतो. त्यातूनच तो समाज घडतो.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अनेक धर्मांचा अभ्यास केल्यानंतर महाबळेश्वर या ठिकाणी ग्रेस डीन हया अमेरिकन मिशनरीकडून त्यांनी ख्रिस्ती धर्महीं समजावून घेतला होता. ख्रिस्ती समाजाकडे पहाण्याचा त्यांचा दृष्टीकोन, त्या समाजाच्या प्रगतीचा मार्ग व समाजाची मानसिकता लक्षात येण्यासाठी ख्रिस्ती समाजाकडे बाबासाहेब कसे पाहतात व त्यातून त्यांनी समाजाला जे मागदर्शन केले, ते आजही विचार करण्यासाठी भाग पाडते. असा दूरदृष्टीकोन त्यांचा ख्रिस्ती समाज संदर्भात दिसून येतो. या अनुषंगान विषय मांडणी करावयाची आहे.

**उद्दिष्ट्ये :-**

प्रस्तुत विषयाचे आकलन होण्यासाठी खालील उद्दिष्टे समोर ठेवलेली आहेत.

१) ख्रिस्ती समाजाकडे पहाण्याचा बाबासाहेबांचा दृष्टीकोन लक्षात घेणे.

२) ख्रिस्ती समाजाला बाबासाहेबांनी केलेले मागदर्शन अभ्यासणे.

३) ख्रिस्ती समाजाची आजची स्थिती स्पष्ट करणे.

४) आरक्षणाविषयी ख्रिस्ती समाजाचा दृष्टीकोन पहाणे.

५) आरक्षणासंदर्भात दलित ख्रिश्चनांवर झालेला अन्याय तपासणे.

ही उद्दिष्टे समोर ठेवून प्रस्तुत विषयाचा अभ्यास करावयाचा आहे.

**संशोधन पध्दती :-**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी समाजशास्त्रीय संशोधन पद्धती आणि आधारभूत ग्रंथांचा आधार घेतलेला आहे.

**डॉ. आंबेडकरांचे ख्रिस्ती समाजाविषयीचे विचार:-**

सोलापूर येथे ५ जानेवारी, १९३८ रोजी आग्रहामुळे स्थानिक ख्रिस्ती समाजाला उद्देशून केलेल्या भाषणामध्ये बाबासाहेब म्हणतात, "धर्मशास्त्राचा तुलनात्मक अभ्यास केल्यामुळे ख्रिस्त आणि बुद्ध यांच्या व्यक्तिमत्त्वाचा माझ्या मनावर फार परिणाम झालेला आहे. आम्हांस असा धर्म पाहिजे की, जो एका मनुष्याने दुसऱ्या मनुष्याशी कसे वागावे हा उपदेश करून समता, बंधुत्ता नि स्वातंत्र्य या तत्त्वत्रयींप्रमाणे मनुष्याने दुसऱ्या बांधवाविषयी आणि देवाविषयी कर्तव्य काय हे शिकवील." त्या ख्रिश्चन श्रोत्यांना असेही सांगितले की, तुमचे धर्मबंधू दक्षिण हिदुस्थानात ख्रिस्ती देवळांमधून जातिभेद पाळतात. शिवाय राजकीय दृष्ट्या ते मागासलेले आहेत. जर महार विद्यार्थी ख्रिश्चन झाला तर त्याची शिष्यवृत्ती बुडते. म्हणून अस्पृश्य ख्रिश्चन झाले तर त्यांचे त्यामुळे आर्थिक हित काहीच साधणार नाही. दुसरे असे की, सामाजिक अन्याय दूर करण्यासाठी ख्रिश्चन लोक कधीही लढले नाहीत." (डॉ. बाबासाहेब आंबेडकर - धनंजय कोर, पृ. ३३२) ख्रिस्ती लोकांना राजकीय हक्क कळत नाहीत. हा ख्रिस्ती लोकांच्या मोठा दोष आहे. असे बाबासाहेब मानतात. कोणतीही संस्था राजकीय

आधाराशिवाय जगू शकत नाही. आम्ही अस्पृश्य अज्ञानी आणि अनक्षर असलो तरी आम्ही चळवळ उभारली आहे. आमच्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्या मिळत आहेत. त्यांच्यासाठी वसतीगृहे आहेत. ख्रिस्ती विद्यार्थ्यांना यां सवलती नाहीत. शिष्यवृत्ती मिळणाऱ्या अस्पृश्य विद्यार्थ्यांने जर धर्मांतर केले तर त्याची शिष्यवृत्ती बंद केली जाते. तुम्ही तर राजकारणात असता तर असे झाले नसते. (ज्ञानोदय, - एप्रिल २००८ पृ. ६)

आज शहाऐंशी वर्षानंतरही डॉ. आंबेडेकर यांनी व्यक्त केलेले विचार ख्रिस्ती समाजासाठी तंतोतंत लागू आहेत. आजचा ख्रिस्ती समाज हा स्वतःमध्येच रमलेला आहे. अंतर्गत कलहात त्याचा वेळ चाललेला आहे. सुशिक्षितांनी आणि अधिकारी पदावरील लोकांनी समाजापासून दूर राहणे, सामाजिक अन्याया विरुध्द आवाज न उठवणे हे चालूच आहे. प्रभावी राजकीय नेता नसलेला समाज म्हणून आज ओळखला जातो आहे. आता तरी ख्रिस्ती समाज जागा व्हावा व हक्कासाठी संघर्ष करण्यास पुढे यावा असे वाटते! डॉ. बाबासाहेबांच्या व्यक्त झालेल्या विचारात ख्रिस्ती समाजाच्या हक्काची खरी जाणीव दिसून येते. डॉ. आंबेडकरांचा संघर्ष या देशातल्या दुर्लक्षितांसाठी होता. राष्ट्रीय प्रवाहातून ज्यांना बाजूला टाकले गेले आहे. अशा लोकांना या प्रवाहात आणून शासन आणि प्रशासनात हिस्सेदारी देणे हा प्रमुख विचार त्यामागे होता.

**गोलमेज परिषदेत ख्रिश्चनांची वकिली :-**

भारतीय स्वातंत्र्य दृष्टिपथात नसताना भरविण्यात आलेल्या गोलमेज परिषदेत महात्मा गांधींना हादरवून टाकण्याचे धैर्य आंबेडकरांनी दाखविले होते. संपूर्ण देशाचे प्रतिनिधित्व कांग्रेस पक्ष हाच करीत आहे, अशी भूमिका महात्मा गांधींनी घेतली होती. अल्पसंख्य म्हणून मुस्लिम आणि शीख हया दोन धर्मजातींनाच मान्यता देण्यास ते तयार होते. 'महात्मा गांधी जर अस्पृश्य, अँग्लो इंडियन आणि इंडियन ख्रिश्चन ह्यांना अल्पसंख्य मानण्यास तयार नाहीत तर मग आम्हाला या बैठकीत भाग घेऊन काय उपयोग?' असा प्रश्न आंबेडकरांनी विचारताच ख्रिस्ती प्रतिनिधी तत्काळ आंबेडकरांच्या बाजूने खंबीर उभे राहिले. 'डॉ. आंबेडकरांनी आज आमचे डोळे उघडले आणि महात्मा गांधी आम्हाला अल्पसंख्य मानीत नाहीत ही गोष्ट देखील आज आम्हांला प्रथमच कळली' असे उद्‌गार ख्रिस्ती प्रतिनिधींनी त्यावेळी काढले.

**ख्रिस्ती धर्मीयांचे समाजातील दलितत्व:-**

हे समजावून घेण्याची कुवत मराठी ख्रिस्ती समाजातील धर्मनेत्यांच्यात नाही याचा खेद वाटतो. याची कारण ख्रिस्ती समाजातील अविचारवंतांच्या राजकारणात आहेत. ख्रिस्ती 'दलित' या शब्दावरच घोळ घालून धर्म आणि समाज हया क्षेत्रातील ज्यांना काही कळत नाही असे अविचारवंत विविध प्रकारे विरोधी प्रतिपादन करीत आहेत. पण 'ख्रिस्त' उपेक्षित दलितांमध्ये होता. दलितांसाठी होता हे सत्य राजकीय दृष्टीने दूर सारले जात आहे. त्यातूनही 'ख्रिस्ती दलित' हे विशेषतः सर्वच ख्रिस्ती समाजाला लागू करता येत नाही. सर्वच ख्रिस्ती स्वतः ला दलित मानत नाहीत. हे जरी खरे असले तरी महाराष्ट्रात ही गावागावांतून, शहरांच्या झोपडपट्ट्यांतून ख्रिस्ती दलित मरण जगत आहेत. याची तिळमात्र जाणीव ख्रिस्ती समाजाला कशी होऊ शकत नाही? ख्रिस्तीपणा म्हणजे मानवता हे जर खरे असेल तर ख्रिस्ती समाजातीलच दलितांबद्दल ख्रिस्ती धर्मियांना काहीच कसे वाटू शकत नाही? सुनील आढाव, स. ना. सूर्यवंशी या ख्रिस्ती विचारवंताना याचा खेद वाटतो. ते म्हणतात, 'तकलादू कारणांमुळे ख्रिस्ती दलितांचा विचार मराठी ख्रिस्ती समाज करणार नसेल तर तो केवळ मराठी ख्रिस्ती समाजाला आत्मघात नसून ख्रिस्ती धर्माचाही विश्वासघात ठरणार आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ख्रिस्ती समाजाला मागदर्शक ठरणारा विचार सांगितल्यानेच समाजातील विचारवंताना, नेत्यांना आपल्या सामाज अस्तित्वासाठी संघर्षाचा लढा उभा करण्याचा एक मार्ग मिळाला काही वर्षापासून दलित ख्रिस्ती लोकांचा आरक्षणाच्या हक्कासाठी संघर्ष सुरु आहे. ख्रिस्ती दलितांना संविधानाचा आधार हवा, ख्रिस्ती दलितांना राखीव जागा किंवा विशेष हक्क हवेत ह्याचा अर्थ संपूर्ण ख्रिस्ती समाजाला त्यात समाविष्ठ करावे असा नाही. सामाजिक दृष्टीने मागासवर्गीय नसलेल्या सर्वच ख्रिस्ती समाजासाठी शासकीय सेवेतील नोकऱ्यांच्या जागा राखीव ठेवल्या जातील असेही नाही. जे ख्रिस्ती धर्मीय स्वतःला दलित मानत नाहीत, ज्यांच्या वाट्याला दलित्व आलेले नाही अशांसाठी राखीव जागा देऊ केल्या जातील असेही नाही. तसे होणे अशक्य आहे. राजकीय धूर्तपणामुळे तसे झालेच तर विशेष हक्क नाकारण्याचा अधिकारही ख्रिस्ती समाजाला राहील.

**आरक्षणाच्या बाबतीत दलित, ख्रिश्चनांवर अन्याय:-**

दलित शिखांच्या बाबतीत आणि नवबौद्धांच्या बाबतीत सरकारने ज्या तत्त्वाच्या आधारावर आरक्षण लागू केले ते तत्त्व दलित ख्रिस्ती समाजाच्या बाबतीत लागू केले नाही, दलित ख्रिस्ती समाजाच्या बाबतीत असा अन्याय स्वातंत्र्योत्तर काळात पाच दशके होत असताना ख्रिस्ती समाजच शांत मूग गिळून बसला असल्याचे दिसून येते. हा एकूण प्रकार चीड आणण्यासारखा आहे. इ.स.१९७०च्या दशकात फादर लिओ देसाई, फादर मॅथ्यू लेदर्ले आणि प्रगती पदवीधर संघटना या

ख्रिस्ती युवकांच्या संघटनेने आरक्षणाच्या मुद्द्यांवर महाराष्ट्रात अगदी रान उठविले होते. विविध पातळयांवरील नेत्यांना भेटून या समाजास आरक्षण व इतर सवलती मिळविण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या प्रयत्नांमुळेच दलित ख्रिस्ती समाजाचा महाराष्ट्र सरकारने १९७८ मध्ये इतर मागास वर्गात (ओबीसी) मध्ये समावेश केला. मात्र, अनुसूचित समाजास लागू असणारे आरक्षणातील सवलती मात्र या समजास मिळाल्या नाहीत. दुर्देवाने फादर देसाईंच्या निधनानंतर या चळवळीचे नेतृत्त्व पुढे कुणी चालविले नाही. रेव्ह निर्मळ यांचे एक फार मोठे योगदान म्हणजे त्यांनी दलित ख्रिस्ती समाजास देशातील आणि महाराष्ट्रातील प्रमुख दलित प्रवाहात आंबेडकरवादी चळवळीत सामील होण्यास प्रवृत्त केले. 'गावकुसाबाहेरचा ख्रिस्ती समाज' या आपल्या पुस्तकात पृ.६१वर कामिल पारखे लिहितात, "आरक्षणावरचा दलित ख्रिस्ती समाजांचा नैसर्गिक हक्क शाबीत करण्यात मात्र आपण मोठ्या प्रमाणात अयशस्वी ठरलो आहोत. सध्याची आपली लढ्याची एकाकी पध्दत, आपण अशीच चालू ठेवली तर या प्रयत्नांना यश मिळेल की नाही याबाबत मला शंकाच वाटते."

कामिल पारख यांच्या या विधानान डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी ख्रिस्ती समाजाच्या स्थितीचे आणि प्रवृत्ती विषयी व्यक्त केलेले विचार त्याचे दूरगामी परिणाम आज ख्रिस्ती समाजाच्या राजकिय व सामाजिक स्थितीवर झालेले दिसतात. जो समाज राजकारणात उतरत नाही जो समाज राजकारणामध्ये आपली प्रगती करीत नाही. त्या समाजाची खऱ्या अर्थाने प्रगती होऊच शकत नाही. ही बाबासाहेबांची ख्रिस्ती समाजांविषयीची भविष्यवाणी खरी ठरली आहे. आज ख्रिस्ती समाजाला आपल्या हक्काची जाणीव होताना दिसून येत आहे. विचारवंतामध्ये यासंबंधी विचारविनिमय झोलेला दिसून येतो.

**धर्मांतरानंतरही दलितांचा आरक्षणावरचा हक्क कायम राहतो- डॉ. आंबेडकर:-**

हिंदू धर्माचा अस्पृश्यांनी त्याग करून किंवा इतर कुठलाही धर्म स्वीकारला तरी दलित म्हणून त्यांना मिळणाऱ्या आरक्षण आणि इतर सवलतींवर त्यांचा हक्क अबाधित राहतो. असे भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनीच ठासून सांगितले आहे. आपल्या हजारो अनुयायांसह नागपुरात बौद्ध धर्माची दीक्षा घेतल्यानंतर केलेल्या आपल्या भाषणात बाबासाहेबांनी धर्मांतराबाबतची आपली भूमिका स्पष्ट केलीच, त्याशिवाय धर्मांतरानंतरही दालित म्हणून मिळणाऱ्या सर्व प्रकारच्या सवलती आणि आरक्षण पुढेही चालूच राहतील असा विश्वास त्यांनी आपल्या अनुयायांना दिला. आत्मसन्मानाने जगण्यासाठी हे धर्मांतर आहे. असे ते इतरांना सांगत.

ब्रिटिश काळात दलित ख्रिस्ती समाजासाठी आरक्षण होते. १९२५ पासून हा लाभ अनुसूचित जाती-जमातींपासून ख्रिस्ती झालेल्यांना मिळत होता. मुंबई इलाखाच्या राज्यपालांनी हिंदी ख्रिस्ती लोक कारकूनाच्या भरतीसाठी मागासवर्गीय समजले जावे. असा आदेश काढला होता. या आदेशानुसार अँग्लो ईडियन, गोवन्स, ईस्ट इंडियन्स आणि मेंग लोरियन ख्रिश्चनांना प्रगतीशील समाज ठरविले गेले आणि त्याशिवाय इतर हिंदी ख्रिस्ती लोकांचा मागासवर्गीयांमध्ये समावेश केला जाऊन त्यांना नोकरभरतीसाठी आरक्षण सुविधा दिली गेली. असा उल्लेख कामिल पारखे यांच्या 'दलित ख्रिश्चनांचा आरक्षणाच्या हक्कासाठी लढा' या पुस्तकांच्या पृ.२२ वरती दिसून येतो. मागासवर्गीय ख्रिस्ती समाजाला सवलती मिळाव्यात याबद्दल युरोपियन मिशनरीही प्रयत्न करत होते. अशा प्रकारे ब्रिटिश काळात दलित ख्रिस्ती समाजाच्या आरक्षणाबाबतची स्थिती होती. या काळात आरक्षणाचा लाभ ख्रिस्ती समाज घेवू शकला नाही हे दिसून येते.

**ख्रिस्ती व्यक्तिंच्या संदर्भातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर :-**

रेव्ह. विश्वास आनंद सत्राळकर हे ख्रिस्ती समाजातील विद्वान, ज्ञानी, विचारवंत म्हणून सुपरिचित होते. बाबासाहेबांचा आणि त्यांचा स्नेह आपुलकीचा, आदराचा होता. एकदा पन्हाळगडावर दोघांची भेट झाली. दोघेही एकमेकांच्या विद्वत्तेबद्दल बेहद्द खूष होते. रेव्ह. सत्राळकर म्हणाले, "बाबासाहेब, आपण ख्रिस्ताकडे येऊन आत्मोध्दार प्राप्त करून घ्या". डॉ. बाबासाहेब म्हणाले "विश्वासराव, तुमच्यासारख्या विद्वानांची या देशाला फार मोठी गरज आहे. तुम्ही निवडणुकीस उभे राहा. मी माझ्या समाजास तुम्हांस मते देण्यास सांगतो." अशाप्रकारे दोघांच्याही विचारातील हा भेद आपणास येथे समजतो. 'ख्रिस्ती सैनिक'- म. अ. दामले. पृ. १५ वर हा उल्लेख मिळतो.

'दै. लोकमत' अहमदनगर आवृत्ती दि. ०६ डिसेंबर, २०१८ मध्ये वय वर्षे ९१ असणारे मार्कस शिरसाठ नावाच्या व्यक्तीची बाबासाहेबांच्या संदर्भातील एक आठवण प्रसिद्ध झाली. मनमाड रेल्वे स्थानकावर बाबासाहेबांना जवळून पहाण्याचा योग मार्कस शिरसाठ यांच्या जीवनात आला. ते आठवणी सांगताना म्हणतात, '१९४८ चा काळ होता मनमाड याठिकाणी बाबासाहेबांची सभा होणार असते. या दिवशी आपल्या काही मित्रांसोबस पहाटे उठून पायी चालत ६५ किमी अंतर कापून मनमाड येथे सायंकाळी ५ वाजता पोहचलो. सभेनंतर बाबासाहेब पुढील प्रवासासाठी मनमाड रेल्वे स्थानकात आले. जवळून त्यांना बघावे म्हणून पुढे झालो. डब्याचा दरवाजा उघडल्यानंतर जसा आता बाबासाहेबांचा फोटो आहे,

तसाच सूट, बूट घातलेले बाबासाहेब पाहताच आम्ही धन्य झालो. त्यांचे दर्शन झाले, त्या अर्ध्या मिनिटाच्या संवादांत मी बाबासाहेबांना म्हणालो, 'बाबा मी ख्रिस्ती झालो आहे...' त्यावर ते म्हणाले, 'बरे झाले, माझ्या अगोदर धर्मांतर कले...!' हे एकून मी धन्य झालो."

वरील दोन ख्रिस्ती व्यक्तिंच्या बाबतीत बाबासाहेब सहदयी, प्रेमळ वाटतात, धर्मांतर ही बाब त्यांना महत्वाची आनंदाची वाटले. कारण बाबासाहेबांच्या दूरदृष्टीमध्ये खूप मोठी क्रांती त्यामुळे दिसून येते. ख्रिस्ती व्यक्तिंच्याकडे ते आपुलकीने पाहतात. हे आपलेच बांधव आहेत, ही त्यांची मानवतावादी कृती समाजाला आत्मभान देते.

**निष्कर्ष :** 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि ख्रिस्ती समाज' विषयाचा अभ्यास करताना खालील निष्कर्ष समोर येतात.

१. बाबासाहेबांचा धर्माच्या आवश्यकतेवर विश्वास होता. ते अनेक धर्माचा अभ्यास करतात तेव्हा ख्रिस्ती धर्मही त्यांनी समजून घेतला होता. परमेश्वरी शक्तीला ते मानतात पण बुद्धाच्या भक्तीत ते आपले अध्यात्म विलीन करतात.

२. ख्रिस्ती समाजाविषयीचे बाबासाहेबांचे विचार म्हणजे ख्रिस्ती समाजाचा हक्काची खरी जाणीव आहे. बाबासाहेब संघर्ष केल्यानेच ख्रिस्ती समाज राजकारणात व समाजकारणामध्ये आपला ठसा उमटविल तेव्हा त्यांना प्रगतीचा मार्ग दिसेल असा विचार देतात.

३. ख्रिस्ती समाजाला अल्पसंख्य मानण्यास महात्मा गांधीचा विरोध होता. त्याला बाबासाहेबांनी प्रखर विरोध केला. तेव्हा गोलमेज परिषदेमध्ये ख्रिस्ती प्रतिनिधींना हे पहिल्यांदा समजले.

४. 'खिस्ती दलित' हे सर्वच ख्रिस्ती समाजाला लागू करता येत नाही.

५. ख्रिस्ती दलितांना आत्मभानाची जाणीव निर्माण होताना दिसत आहे याचे कारण डॉ. बाबासाहेब आंबेडकर आहेत.

६. आरक्षणाच्या संदर्भात दलित ख्रिस्ती समाजावर अन्याय होताना दिसतो, तेव्हा काही नेते मंडळींनी लढा उभा करताना दिसतात.

७. धर्मांतरा नंतरही दलितांच्या आरक्षणावरचा हक्क कायम राहतो. हा आंबेडकरांनी दिलेला दलितांना विश्वास ख्रिस्ती समाजाला प्रेरणादायी आहे.

८. ब्रिटिश काळात दलित ख्रिश्चनांना आरक्षण होते. त्याचा लाभ ख्रिस्ती समाज घेवू शकला नाही.

९. ख्रिस्ती समाज व व्यक्तींच्या संदर्भात डॉ. बाबासाहेब आंबेडकर सहृदयी, सहिष्णू, आत्मियतेने व संवेदनशील वृत्तीने आपला सहयोग देतात हे दिसून येते.

**संदर्भ :-**


1. कीर धनंजय, २००६, **डॉ. बाबासाहेब आंबेडकर**, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई
2. पारखे कामिल, २००६, **दलित ख्रिश्चनांचा आरक्षणाच्या हक्कासाठी लढा**, सुगावा प्रकाशन, पुणे
3. आढाव सुनील, २००१, **ख्रिस्ती लोकहितवादी**, प्रबोधन प्रकाशन, नागपूर
4. पारखे कामिल, २०२१, **गावकुसाबाहेरचा ख्रिस्ती समाज**, चेतक बुक्स, पुणे
5. दामले म.अ., २०२२, **ख्रिस्ती सैनिक**, सुमित्र प्रकाशन, पुणे
6. **'ज्ञानोदय'**, एप्रिल २००८, संपादक, रेव्ह. प्रा. सुधीर शर्मा